Please Consider the Environment Before Printing…

Date: 14/10/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 02**

आपल्या वाताच्या, आतल्या वाताच्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष



## साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर

नरसिंह चिंतामण केळकर ऊर्फ तात्यासाहेब केळकर हे मराठी पत्रकार, नाटककार, राजकारणी होते. त्यांचा जन्म २४ ऑगस्ट, १८७२ रोजी सोलापुरातील मोडनिंब येथे झाला. इ.स. १८८७ साली मॅट्रिक झाल्यानंतरचे शिक्षण त्यांनी पुण्याच्या फर्ग्युसन, कोल्हापूरच्या राजाराम आणि नंतर पुण्याच्याच डेक्कन कॉलेजातून घेतले. ते केसरी वृत्तपत्राचे संपादक होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ते बाळ गंगाधर टिळकांशीही जवळून जोडले गेले होते. त्यांनी ठाणे येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अध्यक्ष म्हणूनही काम केले होते. १९२३ मध्ये ते इंपीरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या कनिष्ठ सभागृह, केंद्रीय विधानसभेवर निवडून आले आणि १९२९ पर्यंत त्यांनी काम केले. १९२८ मध्ये जबलपूर येथे आणि १९३२ मध्ये दिल्ली येथे ते अखिल भारतीय हिंदू महासभेचे दोनदा अध्यक्ष होते.

नाटक, कादंबरी, लघुकथा, कविता, निबंध, प्रवासवर्णन, चरित्र, आत्मचरित्र, समीक्षा या सर्वच वाङ्मयक्षेत्रांत त्यांनी लेखन केलेले असून इतिहास, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र इ. विषयांच्या क्षेत्रांतही त्यांच्या लेखणीने संचार केला आहे. त्यांच्या विवेचनात्मक ग्रंथांपैकी सुभाषित आणि विनोद, मराठे व इंग्रज (मराठेशाहीचे शतसांवत्सरिक वाङ्मय श्राद्ध), राज्यशास्त्र, भारतीय तत्त्वज्ञान आणि हास्यविनोदमीमांसा हे विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांच्या प्रकाशित लेखनाची पृष्ठसंख्या १५ हजारांच्या आसपास असून त्यात लोकमान्यांचे चरित्र (३ खंड), मराठे आणि इंग्रज, भारतीय तत्त्वज्ञान, 'तोतयाचे बंड' (नाटक), 'कोकणचा पोर', 'बलिदान' यांसह ८ कादंबऱ्या, आदींचा समावेश आहे. त्यांनी लिहिलेली बहुतेक नाटके संगीत नाटके आहेत. त्यांच्या साहित्यातील या अफाट कामगिरीबद्दल त्यांना साहित्यसम्राट म्हणले जाते. न.चिं केळकर यांचे १४ ऑक्टोबर, १९४७ रोजी पुण्यात निधन झाले.

Nashik Edition
Oct 14, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401